**रे.मु.नं. ८/२०१६**
**विनोद कोलते वगैरे वि. विठ्ठल कोलते वगैरे**

## आदेश निशाणी ५ वर

**१.** वादींनी सदर दावा वाटप, ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यात प्रतिवादी क्रमांक १ त ८ यांचेविरूध्द तुर्तातूर्त मनाईची मागणीदेखील केलेली आहे. दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्रमांक १ ते ८ यांनी वाद मिळकतीमधील वादींचे शांततापूर्ण वहिवाटीस अडथळा निर्माण करू नये, तसेच वाद मिळकती तिऱ्हाईत इसमांना तबदील करण्याचा प्रयत्न करू नये, अशा तुर्तातूर्त मनाईची मागणी वादींनी निशाणी ५ नुसारचे अर्जात केलेली आहे.

**वादींचा दावा संक्षिप्त रूपात खालीलप्रमाणे आहे** :—

**वाद मिळकतींचे वर्णन** :—

**२. गांव मौजे पिसर्वे, ता.पुरंदर, जि.पुणे येथील शेतजमिनी मिळकती त्यांचे चतु:सिमापूर्वक वर्णन खालीलप्रमाणे** :—

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | आकार | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हे.आर. | रू.पैसे. | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | १८२ | ४—७६<br>ख.१—४८ | ४—०८ | ओढा | मावडी शिव | १८२ | १८३ |
| सदर मिळकतीपैकी १ हेक्टर ४७ आर क्षेत्र | | | | | | | |
| २ | २५२ | ०—०६ | ०—२२ | २५१ | २५१ | २५३<br>२५४ | २५३<br>६८० |
| सदर मिळकतीपैकी पांच आणे चार पैचा हिस्सा | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २५७ | १—०० ख.०—०८ | १—८१ | २५८ २५९ २६० | २६३ २६४ | २५४ | २५८ |
| सदर मिळकतीपैकी आठ आणेचा हिस्सा | | | | | | | |
| ४ | २४५ | ०—३४ ख.०—६६ | ०—५० | २४४ | ओढा | २४६ | २४० |
| सदर मिळकतीपैकी | | | | | | | |
| ५ | २५३ | ०—३५ ख.०—०६ | १—३७ | २५२ | २५४ | २६७ | ६७९ |
| सदर मिळकतीपैकी आठ आणेचा हिस्सा | | | | | | | |
| ६ | २४९ | ०—६४ ख.०—०२ | २—३८ | २४८ | २५५ | २५० २५१ | ६७८ |
| सदर मिळकतीपैकी आठ आणेचा हिस्सा | | | | | | | |
| ७ | २४३ | १—३९ ख.०—१४ | २—३२ | २४२ | १८८ ते २८८ | २४४ | २४१ |
| सदर मिळकतीपैकी आठ आणेचा हिस्सा | | | | | | | |
| ८ | २४६ | ०—०३ ख.०—०२ | ०—०९ | २४४ | २५५ | २४७ | ६८३ |
| सदर मिळकतीपैकी आठ आणेचा हिस्सा | | | | | | | |

येणेप्रमाणे शेतजमिनी मिळकती त्यामधील असणारा दगड, माती, लाकूडफाटा, तसेच इतर तदंगभूत वस्तूसहीत मिळकती.

**३.** वादी क्रमांक १ व २ हे प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांची अपत्ये आहेत. प्रतिवादी क्रमांक ६ मंदा ही वादींची आई आहे. व प्रतिवादी क्रमांक ५ शरद हे वादींचे चुलते आहेत. प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल या वादींचे वडीलांनी प्रतिवादी क्रमांक ४ नंदा या महिलेला रखेल म्हणून ठेवलेले आहे. व तिच्यापासून विठ्ठल यांना प्रतिवादी क्रमांक २ व ३ अशी दोन अपत्ये झालेली आहेत. प्रतिवादी क्रमांक ७ व ८ हे तिऱ्हाईत इसम आहेत, ज्यांना

प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल व प्रतिवादी क्रमांक ५ शरद यांनी वाद मिळकत गट क्रमांक १८२ मधील काही क्षेत्र विकलेले आहे.

४. वाद मिळकती या कै.नामदेव यांच्या वडीलोपार्जित मालकी वहिवाटीच्या होत्या. कै.नामदेव यांना प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल व प्रतिवादी क्रमांक ५ शरद अशी दोन अपत्ये होती. तसेच कै.नामदेव यांना इतर पाच मुली होत्या. कै.नामदेव मयत झाले आहेत. कै.नामदेव यांचे मृत्युनंतर त्यांचे पत्नीने व इतर पाच मुलींनी वाद मिळकतीमध्ये असणारे त्यांचे सर्व हक्क व अधिकार प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल व प्रतिवादी क्रमांक ५ शरद यांना दिलेले आहेत. आणि त्यामूळे वाद मिळकतीमध्ये विठ्ठल व शरद यांचा प्रत्येकी १/२ इतका हिस्सा आहे.

५. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांचा मुलगा व मुलगी या नात्याने वाद मिळकतीमध्ये वादी यांचाही हक्क वा अधिकार आहे. आणि वादींनी त्याबाबतची मागणी प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांचेकडे केली असता, प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांनी त्यास नकार दिला.

६. वादींची आई म्हणजेच प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांनी प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल या त्यांचे पतीविरूध्द सासवड येथील न्यायालयात पोटगीचा अर्ज दाखल केला होता. त्या अर्जामध्ये मंदा व विठ्ठल यांचेमध्ये तडजोड झाली व त्या तडजोडीनुसार गट क्रमांक १८२ या वाद मिळकतीपैकी ४०आर इतके क्षेत्र व गट क्रमांक २४३ पैकी २०आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ६ यांना देण्यात आले आहे. तथापि, ती तडजोड वादींवर बंधनकारक नाही. सदर तडजोड झाली तेव्हा वादी अज्ञान होते. व त्यांचेतर्फे तडजोड करण्याचा प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांना कोणताही हक्क वा अधिकार नव्हता. आणि

त्यामूळे त्या तडजोडीने वाद मिळकतीवरील वादी यांचा असणारा वारसाधिकार व एकत्र कुटूंबाचा सदस्य म्हणून असणारा अधिकार कदापी लोप पावत नाही. अशा परिस्थितीमध्ये कोणत्याही कारणाविना प्रतिवादी कमांक १ विठ्ठल यांनी गट कमांक १८२, २४३, २५३, २५७ व २४९ या मिळकतींपैकी काही क्षेत्र प्रतिवादी कमांक २ सोमनाथ यांना दिनांक २२/१२/२०१४ रोजी खरेदीखताने विकलेले आहे. ते खरेदीखत वाद मिळकतीमध्ये असणाऱ्या वादींच्या हिश्श्यावर बिल्कूल बंधनकारक नाही. तसेच कोणत्याही गरजेविना प्रतिवादी कमांक १ विठ्ठल व त्यांचा भाऊ प्रतिवादी कमांक ५ शरद यांनी गट कमांक १८२ मधील काही क्षेत्र प्रतिवादी कमांक ७ व ८ या तिऱ्हाईत इसमांना विकलेले आहे. ते खरेदीखतदेखील वाद मिळकतीवरील वादींच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही.

७. या सर्व कथनांन्वये वादींनी हा दावा दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये वादींनी वाटपाची मागणी मागितलेली आहे. तसेच प्रतिवादी कमांक १ यांनी प्रतिवादी कमांक २ यांना लिहून दिलेल्या व प्रतिवादी कमांक १ व ५ यांनी प्रतिवादी कमांक ७ व ८ यांना लिहून दिलेल्या खरेदीखतांविरूध्ददेखील वादींनी ठरावाच्या आदेशाची मागणी केलेली आहे.

८. प्रतिवादी कमांक १ व ५ यांनी निशाणी ३१ नुसार दाव्यास कैफियत व निशाणी ५ नुसारचे अर्जास लेखी म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी कमांक ६ मंदा या वादींच्या आईने प्रतिवादी कमांक १ विठ्ठल यांचेविरूध्द पोटगीची केस केली होती. त्या केसमध्ये वादींची आई मंदा व प्रतिवादी कमांक १ विठ्ठल यांचेमध्ये तडजोड झाली असून, त्या तडजोडीनुसार वादी व त्यांच्या आईला गट कमांक १८२ पैकी ४०आर व गट कमांक २४३ पैकी २०आर इतके क्षेत्र दिलेले

आहे. हा हिस्सा, वादींना वाद मिळकतीमध्ये त्यावेळी मिळणाऱ्या हिश्श्यापेक्षाही जास्त हिस्सा होता. आणि त्याचवेळी प्रतिवादी क्रमांक ६ मंदा व वादी यांचा वाद मिळकतीशी संबंध संपलेला आहे. वाद मिळकती या प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांच्या मालकीच्या आहेत. आणि त्यामूळे प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांना, तसेच प्रतिवादी क्रमांक १ यांनी प्रतिवादी क्रमांक २ यांना वाद मिळकतीमधील काही क्षेत्र विकलेले आहे. ते क्षेत्र या प्रतिवादींनी खरेदीखताद्वारे विकलेले आहे. त्यामुळे सदर खरेदीखते कायदेशीर आहेत. अशा परिस्थितीमध्ये वादींनी हा खोटा दावा दाखल केलेला आहे. तो नामंजूर करण्यात यावा.

**९.** प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांनी निशाणी ५४ नुसार दाव्यास कैफियत व निशाणी ५ नुसारचे अर्जास लेखी म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, गट क्रमांक १८२ पैकी ०हे. ४१आर इतके क्षेत्र मोबदला देऊन रितसर खरेदीखताने या प्रतिवादींनी प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांचेकडून खरेदी केलेले आहे. आणि त्यामूळे सदर प्रतिवादी क्रमांक ७ व ८ हे गट क्रमांक १८२ मधील ४१आर इतक्या क्षेत्राचे बोनाफाईड पर्चेसर आहेत. त्यांचे खरेदीखत कायदेशीर आहे. आणि त्यामूळे त्यांचेविरूध्द वादींनी मागितलेली मागणी नामंजूर होण्यास पात्र आहे.

**१०.** या अर्जाचे अनुषंगाने मी दोन्ही पक्षांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादी पक्षातर्फे वकील ॲड.काशीद यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांनी प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांचेविरूध्द पोटगीची केस दाखल केली होती. त्या केसमध्ये जी तडजोड करण्यात आलेली आहे, ती वादींवर बंधनकारक नाही. वादींचा वाद मिळकतीमध्ये एकत्र कुटूंबाचा सदस्य म्हणून असणारा हिस्सा त्या तडजोडीने

कधीही संपुष्टात येऊ शकत नाही. ज्यावेळी ती तडजोड झाली, त्यावेळी वादी अज्ञानीदेखील होते. अशा परिस्थितीत ती तडजोड वादींवर बंधनकारक नाही. वाद मिळकतीमध्ये वादींचा हिस्सा आहे.

**११.** प्रतिवादी क्रमांक २ यांचेतर्फे वकील ॲड.श्री.एम.डी.जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक ६ या वादींच्या आई आहेत. त्यांनी प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांचेविरूध्द पोटगीची केस दाखल केली होती. व ती केस प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांनी वादी यांचेतर्फेदेखील दाखल केली होती. त्या केसमध्ये त्यांनी स्वत:करीता व वादींकरीता तडजोड केली होती. व त्या तडजोडीनुसार वाद मिळकतीमध्ये असणाऱ्या हिश्श्यापेक्षाही जास्त क्षेत्र प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादींना दिलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादींनी हा खोटा दावा दाखल केलेला आहे. आणि त्यामूळे निशाणी ५ नुसारचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही.

**१२.** ॲड.श्री.एम.डी.जाधव यांनी युक्तिवादात पुढे असेही सांगितले की, दिनांक १९/०६/२०१४ रोजी प्रतिवादी क्रमांक २ यांनी प्रतिवादी क्रमांक १ यांचेकडून वाद मिळकतीमधील प्रतिवादी क्रमांक १ यांचा हिस्सा खरेदी केलेला आहे. आणि त्यामूळे प्रतिवादी क्रमांक १ यांचा वा इतर पक्षकारांचा वाद मिळकतीशी कोणताही हक्क वा हितसंबंध राहिलेला नाही. खरेदी घेतलेल्या क्षेत्राचे प्रतिवादी क्रमांक २ हे एकमेव मालक आहेत. आणि त्यामूळे त्यांचेविरूध्द कोणताही तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करता येणार नाही.

**१३.** प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांचेतर्फे वकील ॲड.श्री.हरपळे यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक ७ व ८ हे बोनाफाईड पर्चेसर आहेत. त्यांनी मोबदला देऊन प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांचेकडून वाद

मिळकतीची खरेदी केलेली आहे. आणि त्यामूळे सदर प्रतिवादींविरूध्द कोणताही तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करता येणार नाही.

**१४. माझ्या विचाराधिन आलेले मुद्दे त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत :—**

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांनी सकृत दर्शनी केस शाबित केली आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| २ | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय? | अंशत: होकारार्थी |
| ३ | सोयीचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबत :—**

**१५.** वादींनी दाखल केलेल्या दाव्यातील व त्या दाव्यास प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी दिलेल्या कैफियतीमधील कथनांवरून सकृतदर्शनी असे दिसून येत आहे की, वाद मिळकतींचे स्वरूप वडीलोपार्जित आहे, हे दोन्ही पक्षांना मान्य आहे. वादी हे प्रतिवादी क्रमांक १ यांचीच अपत्ये आहेत, हेदेखील दोन्ही पक्षांना मान्य आहे. वाद फक्त इतकाच आहे की, प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांनी प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल यांचेविरूध्द दाखल केलेल्या पोटगी अर्जामध्ये जी तडजोड झालेली आहे, त्या तडजोडीनुसार वाद मिळकतीमधील वादींचे हिंदु एकत्र कुटूंबाचे सदस्य म्हणून असणारे अधिकार लोप पावतात का? हा प्रश्न सुनावणी झाल्यानंतरच निष्कर्षित करता येईल.

त्याचेवर कोणतेही सकृतदर्शनी मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. तथापि, वादींना सकृतदर्शनी केस आहे. वाद मिळकती वडीलोपार्जित आहे, वादी हे प्रतिवादी क्रमांक १ यांची अपत्ये आहेत, हे मुद्दे वादींनी सकृतदर्शनी शाबित केलेले आहेत. वाद मिळकतीमधील वादींचा अधिकार लोप पावला आहे का? हा वादग्रस्त प्रश्न वादींनी या दाव्यामध्ये निर्माण केलेला आहे. म्हणजेच वादींना या दाव्यात सकृतदर्शनी केस आहे.

**१६.** प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी गट क्रमांक १८२ मधील ४१गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांना विकलेले आहे. मी गट क्रमांक १८२ चे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले. सदर ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांच्या नावांची नोंद आहे. व त्याचप्रमाणे गट क्रमांक १८२ मधील ०हे. ४०आर. क्षेत्रावर वादी व प्रतिवादी क्रमांक ६ मंदा यांच्या नावांची स्वतंत्र नोंद आहे. गट क्रमांक १८२ मध्ये १हे. ०४आर. इतक्या क्षेत्रावर प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल व प्रतिवादी क्रमांक ५ शरद यांच्या नावांची नोंद आहे. नमुना क्रमांक ८अ चे उताऱ्यावरदेखील गट क्रमांक १८२ मध्ये प्रतिवादी क्रमांक १ विठ्ठल व प्रतिवादी क्रमांक ५ शरद यांच्या नावावर १हे. ०४आर. इतक्या क्षेत्राची नोंद आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्रमांक ७ व ८ हे गट क्रमांक १८२ मधील ४१ गुंठ्यांचे बोनाफाईड पर्चेसर आहेत, हे कथन सकृतदर्शनी योग्य वाटत आहे. आणि त्यामूळे सदर दोन प्रतिवादींविरूध्द वादींना सकृतदर्शनी केस नाही. तथापि, प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांचेविरूध्द मात्र वादींना सकृतदर्शनी केस आहे. आणि म्हणून मी मुद्दा क्रमांक १ला अंशतः होकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत</u> :—**

**१७.** निश्चितच वादींना सकृतदर्शनी केस आहे. वाद मिळकतीमध्ये वादींना हक्क व अधिकार आहे का? हे दाव्याचे सुनावणीनंतरच निष्कर्षित करता येईल. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांचेविरूध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित न केल्यास, वाद मिळकतीच्या महसूल दप्तरी असणाऱ्या नावांच्या नोंदींआधारे, सदर प्रतिवादी वाद मिळकती तबदील करतील, ही वादींनी व्यक्त केलेली शक्यता नाकारता येत नाही. आणि त्यामूळे तुर्तातूर्त मनाई आदेश पारित न केल्यास, वादींचे अपरिमित नुकसान होईल. तसा आदेश पारित केल्यास मात्र प्रतिवादींचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींची कोणतीही गैरसोयदेखील होणार नाही.

**१८.** प्रतिवादी क्रमांक ७ व ८ हे मात्र गट क्रमांक १८२ मधील ४१ गुंठ्यांचे बोनाफाईड पर्चेसर आहेत, असे सकृतदर्शनी दिसून आले आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर प्रतिवादींविरूध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित केल्यास, प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांची गैरसोय होईल. निश्चितच सदर प्रतिवादींविरूध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारित न केल्यास, वादींचे मात्र कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. आणि त्यामूळे मुद्दा क्रमांक २ व ३ यांना मी अंशतः होकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u> :—**

**१९.** वादींना प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांचेविरूध्द सकृतदर्शनी केस आहे. प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांचेविरूध्द मात्र वादींना सकृतदर्शनी केस नाही. आणि त्यामूळे सदर अर्ज फक्त प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांच्याविरूध्दच मंजूर होण्यास पात्र आहे. आणि म्हणून मी मुद्दा क्रमांक ४ चे निष्कर्षाप्रती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय लागेपर्यंत, प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी वाद मिळकत तिऱ्हाईत इसमांस हस्तांतरीत करू नये, तसेच प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी वाद मिळकतीमधील वादींच्या सामाईक वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करू नये, असा तुर्तातूर्त मनाईचा आदेश प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांचेविरूध्द पारित करण्यात येत आहे.

**३.** खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सासवड **(अे.आर.दिंडे)**
दिनांक :— २०/०८/२०१८. सह.दिवाणी न्यायाधीश क स्तर सासवड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : M. D. Shirode, Stenographer (L.G.)

Court Name : Shri. Amit R. Dinde
Civil Judge Jr. Division, Saswad.

Date of Judgment : 20/08/2018

Judgment signed by presiding officer on : 20/08/2018

Judgment uploaded on : 01/09/2018